# लम्पी त्वचारोग : कारणे, लक्षणे आणि उपाययोजना

प्रा. अक्षय ढेंगळे
सहाय्यक प्राध्यापक (विस्तार शिक्षण विभाग)

प्रा. स्नेहल लोखंडे
सहाय्यक प्राध्यापिका (पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभाग)

मारोतराव वादाफळे कृषी महाविद्यालय, यवतमाळ

लम्पीस्किन (त्वचा) रोग हा साथीचा आजार आहे. लम्पीचा प्रादुर्भाव सर्व वयोगटातील गाई-म्हशी मध्ये आढळतो व तो मोठ्या प्रमाणात पसरतो. गाई मध्ये याचे प्रमाण म्हशी पेक्षा जास्त दिसते. प्रौढ जनावरापेक्षा लहान वासरामध्ये या आजाराचे प्रमाण जास्त असते. शेळ्या-मेंढ्यामध्ये हा आजार आढळत नाही. या रोगामुळे मरतुकीचे प्रमाण कमी आहे परंतू जनावर अशक्त होते. जनावराची त्वचा कायमस्वरूपी डागाळलेली खराब होते व बाजारमूल्यदेखील कमी होते. विषाणूचे महत्त्वपूर्ण आर्थिक विपरीत स्वरूपाचे परिणाम आहेत कारण बाधित प्राण्यांना त्वचेचे कायमचे नुकसान होते, ज्यामुळे त्यांच्या कातडीचे व्यावसायिक मूल्य कमी होते. याव्यतिरिक्त, या रोगाचा परिणाम दीर्घकाळ दुर्बलता, कमी दुधाचे उत्पादन, खराब वाढ, वंध्यत्व, गर्भपात आणि कधीकधी मृत्यू होतो. भारतात या रोगाची नोंद ओरिसा राज्यात ऑगस्ट २०१९ सर्वप्रथम झाली. महाराष्ट्रातील बऱ्याच ठिकाणी या रोगाची लागण झाल्याचे आढळून येते. त्यामुळे या रोगाचे शास्त्रशुद्ध पद्धतीने व्यवस्थापन आणि लसीकरण करणे अत्यंत महत्वाचे आहे.

## कारणे:

- लम्पीस्किन हा विषाणूजन्य चर्मरोग आहे.
- उष्ण व दमट हवामान रोगाचा प्रसार होण्यास पोषक.
- आजाराचा रोग दर सामान्यपणे १० ते २० टक्के तर मृत्युदर १ ते ५ टक्के.

## लक्षणे:

- बाधित जनावरे २ ते ४ आठवडे बाह्य या रोगाची लक्षणे दाखवत नाहीत.
- जनावरास तीव्र स्वरुपाचा ताप (१०४ ते १०५ फॅरनहाईट) येतो. विषाणूचा संसर्ग झाल्यानंतर सुमारे एक आठवड्यानंतर ताप येतो.
- गाभण जनावरे बाधित झाल्यास गाभडण्याची शक्यता असते.
- फुफ्फुसाच्या दाहामुळे व जनावराना श्वसनास अडथळा निर्माण होऊन मृत्यू होऊ शकतो.
- जनावरांच्या शरीरावर ठळकपणे दिसणाऱ्या गाठी (१० ते २० मि.मि. व्यास) असतात. मुख्यात: डोळे, मान, पाय, छाती, पाठ, मायांग व कासेवर १० ते ३० मि.मी. व्यासाच्या गाठी दिसून येतात. अंगावरील गाठी फुटून जखमा होतात. या रोगाचे वैशिष्ट्य असलेल्या गाठी, विषाणू टोचल्यानंतर सात ते एकोणीस दिवसांनी दिसतात.
- लाळग्रंथींना सुज, पायवर सुज आणि संक्रमित गुरांना देखील त्यांच्या अंगात सूज येऊ शकते.
- दुधाळ जनावरांमधे दुध उत्पादनात घट आढळून येते.
- तोंडात, नाकात व डोळ्यात व्रण उठतात. तोंडातील व्रणामुळे जनावरास चारा खाण्यास व रवंथ करण्यास त्रास देखील होतो. डोळ्यातून चिकट स्राव प्रवाहित होत असतो. डोळ्यातील व्रणामुळे चिपडे येऊन पापण्या एकमेकांना चिकटून जनावर दृष्टी बाधित होण्याची शक्यता असते.
- पायावर सूज येणे व लंगडणे ही लक्षणे मुख्यता आढळून येते. यामुळे जनावरांना चालायला अवघड जाते.
- रक्तातील पांढऱ्या पेशी व प्लेटलेटची संख्या कमी होते.

## लम्पी त्वचा रोगाचा प्रसार:

- रोगाचा प्रसार डास, गोचिड, माशा, कीटक, चिलटे मार्फत.
- निरोगी जनावर बाधित जनावराच्या संपर्कात आल्यास.
- बाधित जनावराच्या अश्रू, नाकातील स्राव व वीर्यामध्ये रोगाचे विषाणू आढळून येतात. हे विषाणू पाणी-चाऱ्या मध्ये मिसळल्याने सुद्धा लम्पीचा प्रसार होतो.
- बाधित नराच्या वीर्यामुळे मादीला व नवजात वासरांना संक्रमण होऊ शकते.
- दूध पिणाऱ्या वासरास बाधित गाईच्या दुधातून कासेवरील जखमामुळे लागण होऊ शकते.

## पशुपालकांनी करावयाच्या उपाययोजना:

- बाधित जनावरांना वेगळ्या गोठ्यात ठेवावे
- तात्काळ नजीकच्या पशुवैदयास संपर्क साधावा
- जनावराच्या संपर्कात आलेले वाहन (बैलगाडी) आणि गोठा निर्जंतुक करावा
- जनावराच्या अंगावर आणि गोठ्यात किटकनाशक औषधांची फवारणी करावी. गोठ्यांची स्वच्छता करावी.
- जनावरांना सकस, पौष्टिक, संतुलित आहार द्यावा.
- पशुपालकांनी रोगबाधीत जनावरांना हाताळल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुवायला हवेत.
- रोगाचा प्रादुर्भाव असलेल्या भागात जनावरांची ने आण व वाहतूक बंदी करावी. कोणत्याही संभाव्य रोगी जनावरास निरोगी जनावरांच्या कळपात प्रवेशास बंदी घालावी.
- रोगग्रस्त जनावराचा मृत्यु झाल्यास मृतदेह आठ फुट खोल खड्ड्यात पुरावा.
- प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाने लसीकरण करणे अत्यंत महत्वाचे ठरते. चारा कमी खाणाऱ्या जनावराचा तात्काळ ताप मोजावा व नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून उपचार करून घ्यावा.
- १८००-२३३०-४१८ या निशुल्क टोल फ्री क्रमांकावर सकाळी ८ ते संध्याकाळी ६ या वेळेत पशूसंवर्धन विभागाशी संपर्क करून या आजाराविषयी माहिती घेऊ शकतात.

★ ★ ★ (संपर्क: +९१ )